
[illegible]

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur(M.S), India

Young Researcher Association

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue-19 July-Aug-2022

CONTENTS


| Sr No | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | डिजिटल पर्यटन<br>प्रा. डॉ. शिरोळे अनिल विजय, गायकवाड प्रतिमा शिवाजी | 1 to 4 |
| 2 | शाश्वत विकासात जलसंपदाचे महत्त्व<br>प्रा. मनोहर नारायण मोरे | 5 to 7 |
| 3 | भारतातील आदिवासी जमातींचा वर्गीकृत अभ्यास<br>डॉ. शरद बाबुराव सोमवणे | 8 to 13 |
| 4 | भारतीय लोकसंख्येची वयोरचना<br>डॉ. हरी साधू माघमारे | 14 to 17 |
| 5 | समुदायाचे आरोग्य (Health in Community)<br>प्रा.दत्तात्रय प्रभुराव मुंढे | 18 to 22 |
| 6 | आजच्या काळात भारतीय महीलांचा आहार व आरोग्य – एक अभ्यास<br>प्रा.कविता आर.किर्दक | 23 to 25 |
| 7 | भारतातील शाश्वत विकास ध्येय : बहुआयामी दारिद्रय निर्देशांक वस्तुस्थिती<br>डॉ.बिरादार माधवराव नरसिंगराव, चव्हाण उदयराज चंदन | 26 to 29 |
| 8 | कालाराम मन्दिर प्रवेश: एक सामाजिक-आर्थिक उन्नति का मार्ग<br>डॉ बृजेन्द्र सिंह बौद्ध | 30 to 34 |
| 9 | सामाजिक शास्त्रातील अर्थशास्त्राचे योगदान<br>डॉ. सुरेखा भागुजी भिंगारदिवे | 35 to 37 |
| 10 | महाराष्ट्रातील महिला धोरणाची वास्तविकता<br>प्रा. सि. के .भोवते | 38 to 41 |
| 11 | महात्मा बसवेश्वरांचे मानव समाजासाठी केलेले योगदान<br>प्रा. डॉ. सोमगोंडे निंगप्पा सिद्राम | 42 to 44 |
| 12 | मनुष्य जन्म से नही, कर्म से श्रेष्ठ है : संत रैदास<br>प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार | 45 to 47 |
| 13 | परभणी जिल्ह्यातील पर्यटन स्थळे<br>प्रा.डॉ. देशमुख एस .बी. | 48 to 51 |
| 14 | जलवायु परिवर्तन व ग्लोबल वार्मिंग का मानव सभ्यता पर प्रभाव<br>श्रीमती सरला देवी चक्रवर्ती | 52 to 62 |
| 15 | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ संलग्नित महाविदयालयीन ग्रंथालयातील सेवा सुविधा व माहिती तंत्रज्ञान आधारित साधनांची उपलब्धता : एक अभ्यास<br>अंबादास वसंत खिलारे, डॉ. दिलीप डी. मेत्री | 63 to 66 |
| 16 | संस्कृत : एक वैज्ञानिक भाषा<br>डॉ. सत्येंद्र राऊत | 67 to 69 |
| 17 | अर्थशास्त्र सामाजिक विज्ञान (Economics as Social Science)<br>प्रा. गणेश गंभीरराव देशमुख | 70 to 72 |
| 18 | भारतातील महिला रोजगार व लिंग असमानता<br>प्रा.सुदेवाड एस.व्ही. | 73 to 76 |
| 19 | हैद्राबाद मुक्तिसंग्राम आणि आर्यसमाज चळवळ<br>प्रा.डॉ.सुनिल रजपूत | 77 to 80 |


II

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.19 July – Aug 2022

# हैद्राबाद मुक्तिसंग्राम आणि आर्यसमाज चळवळ

प्रा.डॉ.सुनिल रजपूत
जवाहर महाविद्यालय, अणदूर ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद
*Corresponding Author-* प्रा.डॉ.सुनिल रजपूत
Email- rajputsunil764@gmail.com

**सारांश**

ब्रिटिश राजवटीत भारतात ५६३ देशी राज्ये व संस्थाने होती. या राज्याचा आणि संस्थानांचा राज्यकारभार देशी राजे व संस्थानिक पाहत असत. दक्षिण भारतात त्रावणकोर, बडोदा, कोल्हापूर, नागपूर आणि हैद्राबाद ही राज्ये होती. यामध्ये हैद्राबादचे राज्य आकाराने दुसऱ्या क्रमांकाचे होते. म्हणून ते महत्त्वाचे होते. हैद्राबाद राज्यात मराठवाडा, तेलंगण व कर्नाटक या प्रादेशिक विभागांचा समावेश होत होता. ब्रिटिशांनी भारतीय स्वातंत्र्याचा कायदा इ.स. १९४७ मध्ये पास केला. या कायद्यानुसार भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिशांच्या राजकीय वर्चस्वातून मुक्त झाला व भारताला स्वातंत्र्य मिळाले. इ.स. १९४७ च्या भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्याने देशी राज्ये आणि संस्थांनी राज्ये भारतात की पाकिस्तानात विलीन करावयाची की स्वतंत्र राहावयाचे याबावतीत स्वातंत्र्य दिलेले होते. १

**प्रस्तावना :**

हैद्राबाद मुक्तिसंग्राम हा भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाचा एक अविभाज्य भाग आहे. परंतु ह्या लढ्याचा इतिहास उपेक्षित राहिला. ह्या लढ्याच्या प्रारंभापासून ते अखेरच्या टप्प्यापर्यंत मराठवाडा अग्रेसर होता तो जनजागृतीत आणि पुढे सशस्त्र आंदोलनासाठीही, असे नरहर कुरुंदकर ह्यांनी म्हटले आहे ते योग्यच आहे. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात घडून आलेल्या प्रबोधनामुळे बुद्धीप्रामाण्यवादी आणि विवेकनिष्ठ असे चिंतन नव्याने सुरु झाले. परंपरागत गोष्टी आणि धर्माचरणातील अनिष्ठ प्रथा यांचा पुनर्विचार होऊ लागला. ख्रिस्ती धर्मप्रचाराकांकडून हिंदू धर्माचरणावर टीका होऊ लागली. हिंदूंची मूर्तीपूजा, जातीव्यवस्था या गोष्टीवर टिका होऊ लागली. यातून हिंदूमध्ये एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण झाला होता.

अशा परिस्थितीत बुद्धीप्रामाण्यवादी चिंतन सुरु झाले. यातून नवे विचार आले, नवी व्यासपीठ निर्माण झाली. दादोबा पांडूरंगाची मानवधर्मसभा स्थापन झाली आणि महाराष्ट्रात प्रबोधनाची चाहूल लागली. त्यापाठोपाठ परमहंस सभा उदयास आली. इ.स. १८४९ च्या दरम्यान दादोबा पांडूरंग, बाबा पदमजी, रामचंद्र बाळकृष्ण जयकर या मंडळींनी मूर्तीपूजा आणि जातीसंस्था नाकारुन एक नवी दिशा समाजाला देण्याचा प्रयत्न केला. मानवतावादी एकेश्वरवाद मांडण्याचा पहिला प्रयत्न म्हणून आपण परमहंस सभेकडे पाहिले पाहिजे. २ प्राचीन परंपरा मधील इष्ट त्या गोष्टींचा स्वीकार करुन प्रगत विचारांशी समन्वय साधण्याची प्रवृत्ती या काळात निर्माण झाली. यातूनच सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळ उदयाला आली. सामाजिक क्षेत्रात जातीसंस्थेचे प्राबल्य, उच्चनिच्चता, अस्पृश्यता बालविवाह अशा अनेक अनिष्ठ गोष्टी रुढ होत्या. धार्मिक क्षेत्रात धर्मभोळेपणा, मूर्तीपूजा, अंधश्रध्दा, कर्मठपणा अशा अनेक गोष्टी प्रचलीत होत्या जुन्या मुळावर घाव घातल्यावाचून त्या दूर होणार नाहीत अशा जाणीवेतूनच अनेक सभांनी आणि समाजांनी जागोजाग त्यांचेविरुद्ध लढा पुकारला. ३

इ.स. १८२८ साली स्थापन झालेल्या ब्राम्होसमाज, १८६७ मध्ये स्थापन झालेल्या प्रार्थना समाज, १८७३ मधील रामकृष्ण मिशन आणि सत्यशोधक समाज, १८७५ मधील थिऑसॉफीकल सोसायटी यासारख्या संघटनांनी धार्मिक आणि सामाजिक पुनर्जागरणचे काम



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

केले. अशा संघटनांपैकी एक लक्षणीय संघटना म्हणजे दयानंद सरस्वतींचा आर्यसमाज होय.

महर्षी दयानंद सरस्वती यांनी इ.स. १८७५ मध्ये मुंबई येथे आर्यसमाजाची स्थापना केली. आणि संपूर्ण देशात आर्य समाजाच्या प्रचार व स्थापनेचे कार्य वेगाने सुरु झाले. हैद्राबाद संस्थानातील बीड जिल्ह्यातील धारूर येथे प्रथम आर्य समाजाची इ.स. १८८० मध्ये स्थापना झाली. [४] वेदांना ज्ञानाचा मूळ स्त्रोत मानून वेदतत्त्वज्ञानाचे आणि वेदकालीन समाज व्यवस्थेचे पुनरूज्जीवन करून हिंदू धर्मातल्या अनेक अनिष्ट रुढी दूर करता येतील ही श्रद्धा घेऊन आर्यसमाज चळवळ उभी राहीली. हैद्राबाद संस्थानात जातीयता व अस्पृश्यता दूर करण्याचे प्रयत्न वेगाने सुरू झाले. इ.स. १९०१ मध्ये स्थापन झालेल्या स्त्री समाज व महिला सभेच्या अनेक महिलांनी आर्य समाजाच्या कार्यात सहभाग नोंदविण्यास सुरुवात केली. [५] पुढच्या दहा वीस वर्षात बिदर, गुलबर्गा परिसरात आणि हैद्राबाद मध्येही आर्यसमाजाचे कार्य विस्तारले. मराठवाड्यात बीड, उस्मानाबाद, निलंगा परिसरातही आर्यसमाजाच्या शाखा निघाल्या.

इ.स. १९२० च्या दशकात आर्यसमाजाच्या शाखा विस्तारण्यास हैद्राबाद संस्थानातील परिस्थिती कारणीभूत ठरली. संस्थानात तवलिग चळवळीच्या रुपाने मोठया प्रमाणात मुस्लीम धर्मांतरे होऊ लागली. अंजूमन-ए-तवलिगचे नेतृत्व करणारा बहादूरखान अत्यंत स्फोटकपणे हिंदू धर्मियांवर टिका करायचा. हिंदूचे धर्मांतर करणाऱ्या या संघटनेला शासनाचा वरदहस्त होता. हैद्राबाद संस्थान हे भारतातले सर्वात मोठे मुस्लीम राज्य् असून ते मुस्लीम बहूल बनण्यातच साऱ्यांचे हित आहे. हिंदूंनी सूज्ञपणा दाखवून राजाचा धर्म स्विकारावा आणि राजनिष्ठा जागव्रावी नसता परिणामांना तयार रहावे अशी एकूण त्यांच्या विचारांची मांडणी असायची [६] या बहादूर खानास हैद्राबादच्या निजाम उस्मान अलीने बहादूर यार जंग ही उपाधी देऊन गौरविले आणि हैद्राबादचे धर्मकारण राजकारण कोणत्या दिशेने वाटचाल करणार याची चुणूक दाखवली. [७] मुस्लीम धर्मप्रसारासाठी पगारी धर्मप्रचारक नेमले गेले. जबरदस्ती करून किंवा आर्थिक प्रलोभने दाखवून धर्मांतर केले जात. हे मुस्लीम धर्मांतर अगदी साधे होते. उर्दुमध्ये लिहिलेल्या धर्मांतराच्या मजकूरावर गरीब हिंदूंचा जबरदस्तीने अंगठा घेतला जाई. हैद्राबाद पुरातत्वीय संग्रहालयातील नोंदीनुसार १९२० च्या दशकात २० हजाराहून अधिक धर्मांतर झाली.

इ.स. १९३० च्या दशकात मुस्लीम धर्मांतर चळवळ तीव्र झालेली दिसते. शेकडो हिंदूंना मुस्लीम करण्यात आले. एकाचवेळी ५०० हिंदूंना मुस्लीम बनवल्याची नोंद इ.स. १९३६ मध्ये आहे. हे धर्मांतर बहाद्दूरयार जंग याने उस्मानाबादमध्ये घडवून आणले. [८] मुस्लीमांच्या वाढत्या अत्याचारामुळे व मुस्लीम धर्मांतराच्या रेट्यामुळे हैद्राबाद राज्यातला सर्व सामान्य समाज हतबल झालेला होता. मुस्लीम धर्माच्यापुढे विरोध करण्याची त्याची शक्तीच नष्ट झाली होती.

अशावेळी त्याला सावरण्याचे काम आर्यसमाजानेच केले. गावोगावी आर्यसमाजाच्या शाखा निघाल्या. १९३१ च्या दरम्यान २० शाखा होत्या त्या दहा वर्षात २५० च्या घरात पोहोचल्या. [९] मराठवाड्यात निलंगा येथे आर्यसमाजाचे उल्लेखनीय केंद्र कार्यरत होते. उदरगीरही आर्यसमाज केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. आर्यसमाज मंदिरात धर्मजागृतीचे काम म्हणून अनेक कार्यक्रम होते. सत्संग, व्याख्याने, भजन, संध्या हवन, गीतगायन आणि स्वाध्याय असे कार्यक्रमाचे स्वरुप असे. त्याशिवाय दलित वस्तीमध्ये सहभोजनाचे कार्यक्रम होत. [१०]

हैद्राबाद संस्थानातील बहुसंख्य रयतेला मुस्लीम अत्याचाराविरुद्ध, शासनाच्या जुलुमाविरुद्ध लढण्याचे सामर्थ्य देण्याचे महत्कार्य १९२० च्या आणि १९३० च्या दशकात आर्यसमाजानेच केले हे ऐतिहासिक सत्य नाकारता येण्यासारखे नाही. आर्यसमाजाचे हे कार्य बहुजनांचा आत्मसम्मान वाढविणारे कार्य होते. हे



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College, 78
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

विसरता येत नाही. या काळात म्हणजे हैद्राबाद मुक्तिआंदोलनाच्या पहिल्या सत्रात आर्य समाजाचा प्रभाव अधिक होता. आंध्रमहासभा व कर्नाटक परिषदेतही आर्यसमाजाचे कार्यकर्तेच सक्रिय होते. ११

मुस्लीम धर्मांतराचे प्रमाण आणि मुस्लीमांच्या अत्याचाराचे प्रमाण जसजसे वाढत गेले तसतसे आर्यसमाजाचे कार्यही विस्तारत गेले. उर्वरीत ब्रिटिश इंडियापासून हैद्राबाद राज्य् एखाद्या अभेद्य किल्ल्याप्रमाणे वेगळे होते. आर्य सामाजिक कार्यकर्ते मात्र अस्वस्थ असत. दिल्ली व पंजाबमधील आर्य समाजी केंद्रावर हैद्राबादमधील परिस्थितीचा विचार होई. १९३६ च्या दरम्यान दिल्लीत हैद्राबाद धर्मांतरावर विचार झाला आणि हैद्राबादमधील मुस्लीम जातीवाद पंथवादाविरुद्ध जनमत मागवण्यासाठी व्यापक अशा सत्याग्रहांची रुपरेखा तयार झाली. त्याचवेळी गुंजोटीचे वेदप्रकाश, बसवकल्याणचे धर्मप्रकाश आणि विदरचे भाई श्यामलाल यांच्या बलीदानाने परिस्थिती चिघळली. सत्याग्रहींचे जथ्थे तयार झाले. हैद्रावाद राज्याच्या सीमेलगत सोलापूर, वाशीम, उमरखेड, नगर, विजयवाडा अशा अनेक ठिकाणी आर्यसमाजी कॅम्प उभारले गेले. आर्यसमाजी सत्याग्रहाला हिंदू महासभेच्या नि:शस्त्र प्रतिकार मंडळाची साथ मिळाली. पुण्याला आर्यप्रतिनिधी सभा सक्रिय झाली होती. उदगीर हे आर्य समाज चळवळीचे प्रमुख केंद्र बनले होते. १९३६ च्या दरम्यान हैद्रावाद राज्यात १० हजार आर्यसमाजी स्वयंयेवक तयार होते. १२ डिसेंबर १९३७ ला सोलापूरला आर्यसमाज संमेलन झाले. सत्याग्रहाचा निर्णय झाला. नारायण स्वामी महाराज यांच्या नेतृत्वात हैद्रावादमधला पहिला सत्याग्रह करण्याचे ठरले. १३ याच काळात संपूर्ण भारतभर हैद्राबाद दिवस म्हणून २२ जानेवारी १९३८ साली साजरा करण्याचे आर्यसमाजाने ठरवले. त्याचदिवशी हैद्राबादेत आर्यसमाजाचा सत्याग्रह सुरु झाला आणि आपल्या मागण्यांचे निवेदन निजाम सरकारला सुपूर्द केले. या मागण्यात प्रामुख्याने,

१) धार्मिक उत्सवांवर बंदी आणणारी आज्ञा परत घ्यावी.
२) आचारांवरील निर्बंध उठवावेत.
३) धार्मिक ग्रंथांची चौकशी निपक्षपातीपणे व्हावी.
४) वर्तमानपत्रे प्रकाशीत करण्याचा अधिकार मिळावा.
५) कुठल्याही ग्रंथावर चौकशीशिवाय बंदी घालू नये.
६) तुरुंगातील कैद्यांचे धर्मांतर होऊ नये.
७) आर्यसमाजी ध्वज लावण्याची परवानगी मिळावी. इ.

मागण्यांचे निवेदन आर्यप्रतिनिधी सभेने मंजूर केले आणि हैद्राबाद मधील लोकांचे संरक्षण करण्याची विनंती आर्यरक्षा समितीला केली. १४ हजारो आर्यसमाजी सत्याग्रहींनी हैद्राबादेत सत्याग्रह केला. सारे तुरुंगात डांबले गेले. याच काळात कॉंग्रेसवर बंदी घालण्यात आली. आर्यसमाजाचे बहुतेक सत्याग्रह हैद्राबाद शहरात झाले. ब्रिटिश व्हाईसरॉयलाही निवेदन देण्यात आले. परिणामी हैद्राबादच्या निजामाने आर्यसमाजाच्या मागण्या मान्य केल्या व सत्याग्रह चळवळ थांबली.

आर्यसमाजाच्या मागण्या मान्य् झाल्या पण त्याची अंमलबजावणी झाली नाही. परिणामी आर्य समाजाचा संघर्ष चालू राहिला. १९४४ ला गुलबर्ग्याला आर्य संमेलन झाले. या संमेलनाच्या पेंडॉलला मुस्लीमांनी आग लावली. परंतु चोर सोडून संन्यासाला पकडण्याचा प्रकार येथे झाला. पंडीत नरेंद्र आणि विनायकराव विद्यालंकार यांनाच तुरुंगात डांबण्यात आले. १९४५ च्या दरम्यान तर हैद्राबाद राज्यातील परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनत गेली.

पुढे सरदार पटेल यांनी हैद्राबाद संस्थानाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी १३ सप्टेंबर १९४८ रोजी संस्थानावर भारतीय लष्कराचे प्रमुख जनरल राजेंद्र सिंह यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली भारत सरकारने संस्थानावर पोलिस कारवाई केली. परिणामी १७ सप्टेंबर १९४८ रोजी सायंकाळी पाच वाजता निजामाने युद्ध थांबवित असल्याची घोषणा केली.

**निष्कर्ष :**

१) हैद्राबाद मुक्तिसंग्राम हा भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाचा एक अविभाज्य भाग आहे.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

२) हैद्राबाद मुक्तिलढ्याच्या प्रारंभापासून ते अखेरच्या टप्प्यापर्यंत मराठवाडा अग्रेसर होता.

३) बुद्धी प्रामाण्यवादी चिंतनातून नवविचार व नव्या व्यासपीठांची निर्मिती झाली.

४) आर्यसमाजाच्या स्थापनेमुळे प्रचार व प्रसाराचे कार्य वेगाने सुरु झाले.

५) हैद्राबाद संस्थानातील बीड जिल्ह्यातील धारुर येथे प्रथम आर्य समाज शाखेची स्थापना (१८८०) साली झाली.

६) हैद्राबाद मुक्तिसंग्रामात आर्य समाजाचे मोलाचे योगदान आहे.

७) आर्यसमाजाचे बहुतेक सत्याग्रह हैद्राबाद शहरात झाले.

८) आर्यसमाजाने हैद्राबाद राज्यातील हिंदू रयतेला संघर्ष करण्याचे सामर्थ्य दिले.

९) हैद्राबाद प्रश्नाला राष्ट्रीय स्तरावर नेमण्याचे कार्य आर्यसमाजाने केले.

थोडक्यात हैद्राबाद मुक्तिसंग्रामात आर्य समाजाचे मोलाचे योगदान होते. संपूर्ण हैद्राबाद संस्थानात संघटनात्मक कार्य करणारी आर्य समाज ही एकमेव संघटना होती. संस्थानातील आर्य समाजी चळवळीमागे संपूर्ण देशातील आर्य समाजी लोकांचे बळ संघटीत झाले होते. हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील आर्य समाजाचे योगदान नेमक्या शब्दात नोंदवायचे झाल्यास असे म्हणता येईल की हैद्राबाद राज्यातील हिंदू रयतेला संघर्ष करण्याचे सामर्थ्य कुणी दिले असेल तर ते आर्यसमाजाने हैद्राबाद प्रश्नाला राष्ट्रीय स्तरावर नेण्याचे कार्य आर्यसमाजाचेच म्हणून आर्यसमाजाची चळवळ ही देशपातळीपासून गावपातळीपर्यंत पोचलेली लोक चळवळच होती. म्हणून हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील आर्य समाज चळवळीला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

संदर्भसूची :


१) डॉ.गायकवाड नरेंद्र, मराठवाड्यातील दलित चळवळ आणि हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम, सुगावा प्रकाशन, पुणे १९९०
२) डॉ.राजेंद्र व्होरा-महाराष्ट्रातील प्रबोधनाची वाटचाल, विचारशलाका, प्रबोधन लातूर, १९९० पृ. ५३
३) भास्कर लक्ष्मण भोळे, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पुणे, १९७८, पृ. ८
४) नरेंद्र पंडीत, हैद्राबादं के आर्योंकी साधना और संघर्ष, गोविंदराम हासानंद, १९७३, पृ. १६
५) कित्ता, पृ. २९
६) बावा, दि लास्ट निजाम पृ. १४७
७) कित्ता, पृ. १४८
८) नरेंद्र चपळगावकर, कर्मयोगी, पृ. १२४
९) अनंत भालेराव, हैद्राबाद मुक्तीसंग्राम आणि मराठवाडा, पृ. १४३
१०) डॉ.प्रभोकर देव, हैद्राबाद लिबरेशन स्ट्रगल कलेक्शन ऑफ डाक्यूमेंटस इन ओरल हिस्ट्री, पृ. १९७
११) नारायणराव कोदाटी, हैद्राबाद लिबरेशन स्ट्रगल मुलाखत, पृ. १७७
१२) डॉ.वी.एस.ढेंगळे, हैद्राबाद फ्रिडम स्ट्रगल, पृ. ६६
१३) डॉ.वी.एस.ढेंगळे, अप्रकाशीत फाईल नं. ८५६, आर्य समाज सत्याग्रह, १९३९, आंध्रप्रदेश स्टेट आर्कीव्हज, हैद्राबाद
१४) डॉ.वी.एस.ढेंगळे, हैद्राबाद फ्रिडम स्ट्रगल, पृ. ६८-६९


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

प्रा.डॉ.सुनिल रजपूत